Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए.फा.प्लॉ.नं.१७८,१७९, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD. (020) 25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे/महत्वाचे

क्र.रा.मं/लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी/२६-२७/४०४४
दिनांक: २९/०९/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

विषय: दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.
संदर्भ: १. या कार्यालयाचे क्र.रा.मं./परीक्षा-३/३४५४, दिनांक: १३/०८/२०२६ रोजीचे पत्र.
२. या कार्यालयाचे क्र.रा.मं./परीक्षा-३/३५०७, दिनांक: १८/०८/२०२६ रोजीचे पत्र.
३. मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, यांचा शासन निर्णय क्रमांक:समिती२०२६/प्र.क्र./८२/मदत-२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६
४. राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी-प्रतिपुर्ती २६-२७/४०३०, दिनांक २८/०९/२०२६ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ व २ अन्वये फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तथापी, शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

त्यास अनुसरून शासन निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित इ.१०वी व इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश येईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत राज्य मंडळामार्फत पुढील सविस्तर सुचना यथाशिघ्र निर्गमित करण्यात येतील. तरी आपणामार्फत विभागातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना तशा तात्काळ सूचना देण्यात याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळास तातडीने सादर करावा.

(मा.अध्यक्ष, यांचे मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त
शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
अमरावती विभाग अमरावती

जा.क्र.अविमं/लेखा/2109
दि.01.10.2026

विषय: माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इ.१० वी १२ वी फेब्रु/मार्च -२०२७ च्या परीक्षेस प्रविष्ट होणार असलेल्या व दुष्काळग्रस्त भागातील सर्व विद्यार्थ्यांची राज्य शासनाने शुल्क माफ केलेली आहे. तरी वरील राज्य मंडळाने दिलेल्या सूचना नुसार सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी कार्यवाही करावी.

(मुळ स्थळप्रत मा.वि.सचिव यांचे स्वाक्षरीत)

1/10/2026
विभागीय सचिव
अमरावती विभागीय मंडळ

प्रत माहितीस्तव
१.मा.सचिव राज्यमंडळ, पुणे
२.शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग, अमरावती
3. सर्व शिक्षणाधिकारी (मा.)अकोला,अमरावती,बुलढाणा,यवतमाळ ,वाशीम
४.विभाग प्रमुख उच्च माध्यमिक व माध्यमिक अमरावती विभागीय मंडळ अमरावती.